Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY


Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

March -2019

SPECIAL ISSUE-CLXIX (A)

## EMERGING TRENDS IN HUMANITIES & COMMERCE



**Executive Editor:**
Prof. Virag S. Gawande
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Guest Editor**
Dr.Dipak N. Raut
Principal
Sarswati Kala Mahavidyalaya,
Dahihanda, Dist -Akola [M.S.]

**Chief Editor**
Mr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

RESEARCH JOURNEY

**This Journal is indexed in :**
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned by CamScanner

ISSN : 2348-7143
March 2019


| | | |
|---|---|---|
| 21 | पर्यावरणाचे व्यवस्थापन आणि आर्थिक विकास प्रा.नंदकिशोर सिंगाडे | 121 |
| 22 | बालकामधील स्थुलता -- एक समस्या डॉ. संगीता घुईखेडकर | 126 |
| 23 | बहुजनवादी गांधी डॉ. अरविंद सोमनाथे | 130 |
| 24 | आनंदवन, वरोरा येथील पर्यावरण व्यवस्थापन, एक अभ्यास डॉ. कीर्ती सदार | 135 |
| 25 | भारतातील ऑनलाईन शॉपींगचे भारतातील विपणन व्यवस्थेवर पडलेले सकारात्मक व नकारात्मक परिणाम -- एक अध्ययन डॉ. प्रशांत एम पुराणिक | 138 |
| 26 | स्त्रीभ्रूणहत्या : एक ज्वलंत समस्या डॉ. राहुल मधुकर रोडे, | 143 |
| 27 | सरोगेट विज्ञापन के संवाद और उत्पाद के संबंधों का विश्लेषण राजेश लेहकपुरे | 147 |
| 28 | स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय ग्रामीण विकास प्रा.डॉ. उल्हास एन. राठोड | 153 |
| 29 | यवतमाळ जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या शेतमजुर स्त्रियांचा आहाराचा दर्जा -- एक चिकित्सक अध्ययन प्रा. सुनिता अ. राठोड | 158 |
| 30 | महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा प्रा. सतीश आर.जाधव | 165 |
| 31 | किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांच्या वर्तणूकीचे अध्ययन प्रा. रेखा य. झोटिंग | 171 |
| 32 | मेळघाटातील पारंपरिक गवळी लोकगीतांमधील वाङ्.मयीन मूल्यदर्शन नरेंद्र पाखरे | 175 |
| 33 | स्त्रीवादाचा मराठी साहित्यावरील प्रभाव डॉ. राजेश मिरगे | 179 |
| 34 | पंडित जवाहरलाल नेहरू यांचे समाजवादा विषयीचे विचार प्रा.विलास मेश्राम | 186 |
| 35 | म्हादेवी के काव्य में विरह भाव डॉ. साळुंखे मनिषा नामदेव | 190 |
| 36 | मध्यमवर्गीय कुटुंबातील गर्भवती आणि स्तनदा महिलांच्या आहार व आरोग्य विषयक समस्या प्रा. मनिषा दे. क्षिरसागर | 194 |
| 37 | महिलाओं के दर्जा की वास्तविकता एवंम् मानवाधिकार प्रा. संदीप हाडोळे | 199 |
| 38 | महानुभाव संप्रदायातील आद्यकवयित्री महदंबा व तिचे धवळे डॉ. सुनंदा गडकर | 203 |
| 39 | मानव अधिकार : दलित महिला : महात्मा गांधी के विचार डॉ. स्मिता जोशी | 205 |




Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013)
Special Issue
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
March 2019

# पंडित जवाहरलाल नेहरू यांचे समाजवादा विषयीचे विचार

प्रा.विलास मेश्राम
सहाय्यक प्राध्यापक डॉ. एल.डी.बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस्,
अॅन्ड कॉमर्स, पवनी, ता.पवनी.जि.भंडारा

## प्रस्तावना:—

जवाहरलाल नेहरू यांचा जन्म अलाहाबादेद १४ नोव्हेंबर १८८९ रोजी एका उच्चभ्रू, संपन्न अशा काश्मिरी ब्राम्हण घराण्यात झाला. त्यांचे वडील मोतीलाल नेहरू हे कॉंग्रेसच्या अग्रगण्य नेत्यांपैकी होते. बालपणी आपल्या व्यक्तिमत्वावर आणि विचारांवर ज्यांनी छाप टाकली अशा दोन व्यक्ती म्हणजे महात्मा गांधी आणि मोतीलाल नेहरू हे होत. अशी नोंद स्वत: जवाहरलाल यांनी केली आहे. 'आनंद भवन' म्हणजे हिंदू, मुस्लिम व इग्रजी अशा तिन्ही संस्कृतीचे समन्वय केंद्र होते. त्यामुळे जवाहरलाल यांच्यावर नकळत उदारमनस्कता, सहिष्णुता व धर्मनिरपेक्षता या गुणांचे संस्कार होत गेले. त्याचबरोबर राष्ट्रभावनेचा व समाजवादाचा वारसा त्यांना आपल्या वडिलांकडूनच लाभला.

## समाजवादाविषयीचे विचार :—

जवाहरलाल नेहरू यांचा कल महाविद्यालयीन शिक्षणापासूनच समाज वादाकडे झुकत गेल्याचे आपल्या आत्मचरित्रात प. नेहरूंनी नमूद केले आहे. परंतु त्याचबरोबर त्यांनी असेही कबूल केले आहे की, तेव्हाचे ते विचार प्रत्यक्ष व्यवहारापेक्षा पुस्तकी ज्ञानावर आधारलेले होते. भूतदयेवर अधिष्ठित झालेल्या आदर्शवादी व अस्फुट अशा कल्पनालहरी होत्या त्यांना शास्त्रीय परिणती प्राप्त झाली नव्हती. पुढे या पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळाली.

साम्यवादाकडे स्वभावत: ओढ आणि भारताचा प्रश्नांना जागतिक संदर्भात विचार करण्यातून तिला मिळालेली पुष्टी, समाजवादी रशियाची जमेची बाजू, रशिया भारत या दोन्ही देशांतील प्रश्नाचे जवळपास सारखेच स्वरूप मार्क्सवादी विचार सरणीची मनात खोलवर रूजलेली तत्वे, एकूण जागतीक राजकारणाचा समाजवादाच्या दिशेने वेगात निघालेला ओघ, राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक स्वातंत्र्याचे अधिक व मौलीक वाटणारे महत्त्व अशा अनेक गोष्टीत नेहरूंच्या समाजवादाचे मूळ शोधत येते.

ब्रिटीश सत्तेखालील भारताच्या सामाजिक — आर्थिक वस्तुस्थीतीचे समाजवादावरील त्यांच्या निष्ठा आणखीच बळकट केल्या. प्रदिर्घ गुलामगीरीने व पारतंत्र्याने या राष्ट्राचे चैतन्य शोषून त्याला नैतिक दृष्ट्या अध:पतनाच्या खाईत लोटले, दारिद्र्याच्या गर्तेत फेकले. आपल्या स्वार्थी राजकीय व आर्थिक महत्त्वकांक्षांच्या पूर्तीसाठी या राष्ट्राचे स्वास्थ्यपूर्ण व स्वयंपूर्ण गणराज्यात्मक ग्रामजीवन व हस्तकला — ग्रामोध्योगप्रधान अर्थव्यवस्था पाया खाली चिरडली. जमीनदारी सुरू करून जमीन मालकीची संपूर्ण कल्पनाच पार बदलून टाकली. सहकाराधिष्ठित वर्ग निर्माण करून त्या वर्गाला शोषण कार्यात सहभागी करून घेतले. खेडयांची, शेतीची बेसुमार दुरावस्था झाली. प्रत्यक्ष दारिद्र्याच्या दर्शनाने नेहरू व्यतीत झाले. त्यांच्या दारिद्र्याकडे पाहिले की माझे अंत:करण कु:खाने व लज्जेने भरून येई. माझ्या सुखासीन आयुष्याच्या विचार मनात आला की, लज्जा वाटे.

नग्न, उपाशी, पिळलेल्या आणि गांजलेल्या हिंदुस्तानाचे नवेच चित्र माझ्या दृष्टीसमोर उभे राहते. मजुरांच्या व भुमिहीन शेतकऱ्यांच्या दैन्याचे त्यांना प्रत्यंतर आले. त्यांचा विचार प्राधान्याने करणाऱ्या राजकारणाची कास धरण्याची प्रेरणा त्यांना त्यातून मिळाली. त्यांची पिळवणूक करण्यात परकीय राज्यकर्त्यांबरोबरच स्वकीय उच्च वर्गीयांचाही मोठा हात असल्याचे त्यांच्या लक्षात आले. शेतकऱ्यांची बंडे चिरडण्यात सरकारचे हात जमीनदार तालुकादारही बळकट करतात हे त्यांनी पाहिले. कर्जापोटी आपले सर्वस्व गमावतांना त्यांनी कित्येकांना पाहिले

Scanned by CamScanner

औद्योगिक कामगार वर्ग वाढला. रशियण राज्यसंस्कृतीमुळे त्या वर्गाला महत्व प्राप्त झाले. त्यामुळे त्यांची स्थिती अगदी शोचनीय असल्याचे नेहरूंना आढळले. सामाजिक–आर्थिक परिवर्तनाची निकड त्यांना जाणवली. त्यांनी समाजवादाचा प्रसार करण्याचे कार्य सुरू केले. विशेषत: बुध्दिजीवी वर्गावर व कॉंग्रेस कार्यकर्त्यांवर त्यांनी समाजवादाचे तत्वज्ञान खोल बिंबवण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले — मी स्पष्टच सांगतो, मी समाजवादावर आणि गणराज्य पद्धतीवर विश्वास बाळगतो. राजे रजवाडयांवर नव्हे, किंवा आधुनिक औद्योगिक राजे निर्माण करणाऱ्या व्यवस्थेवर सुध्दा नव्हे. या नव्या उद्योग समुहांच्या हाती माणसांच्या जीवनावर व भवितव्यावर नियंत्रण करण्याची एवढी प्रचंड सत्ता आहे की पूर्वीच्या काळच्या राजांना ती तेवढी कधीच शक्य झाली नव्हती. १९३६ साली एका पत्रात नेहरूजी लिहितात, 'समाजवाद अशी एक पध्दत आहे की, जीमध्ये भूमी आणि भूमीची फळे यांचा समाजाच्या हितासाठी अशा तऱ्हेने उपयोग व्हावा की मिळणारा लाभ खाजगी मालमत्तेच्या अपघाताने न ठरता लोकांनी केलेल्या सेवेच्या प्रमाणात ठरावा.' उत्पादन आणि वितरणाच्या साधनांचे राष्ट्रीयकरण करून त्याव्दारे आमुलाग्र बदल घडवून आणने हा त्यांच्या मते समाजवादाचा गाभा होय.

जमातवादाने भारताचे स्वातंत्र्य आंदोलन पोखरण्यास प्रारंभ केला होता. कूपमंडुक धार्मिक कार्यक्रम अनेकांना व्यापक समाजवादी कार्यक्रमापेक्षा अधिक महत्वाचे वाटू लागले होते. गरिब जनसंमर्दाच्या ठिकाणी क्रांतिकारक झुंजार पणाचे संस्कार करण्याच्या दृष्टीने राजकिय स्वातंत्र्याबरोबर आर्थिक शोषण मुक्तीवरही भर देण्याचा आग्रह नेहरू यासाठीच धरून होते. समाजवादी निष्ठेमधूनच नेहरूंच्या नियोजनावर विश्वास बसला होता. १९३८ साली प्रस्थापित झालेल्या 'नॅशनल प्लॅनिंग कमिटी' चे अध्यक्ष होते. त्या समितीच्या कार्यानेच भारताच्या भावी काळातील लोकशाही समाजवादाची पायाभरणी केली. समाजजीवनातील लाभ–लोभावर मर्यादा घालणे, विकास मार्गातील अडथळे दुर करणे, झपाटयाने विस्तारत असलेल्या सामाजिक संरचनेचे नेतृत्व करणे, सामान्य माणसाच्या हिताचा मुखत्वे विचार करणे, त्यांचे जीवनमान उंचावणे, त्याला विकासाच्या संधी देणे, त्यांच्या सुप्त गुणवत्तेला व शक्तींना वाव देणे इत्यादी त्या नियोजनाची उद्दिष्टे ठरून गेली. भारताच्या हाडी मुरलेल्या सर्वच व्याधींचे निर्मूलन समाजवादी नियोजनाव्दारेच हाऊ शकेल हा त्यांचा विश्वास बळावतच गेला. दारिद्रय बेरोजगार, दैन्य–दास्य आणि मागासलेपणा या सर्वांवर समाजवाद हाच त्यांना रामबाण उपाय दिसला, समाजवाद हा केवळ आर्थिक सिध्दांत न उरता नेहरूंसाठी तो जीवनाचे नवे आकर्षक तत्वज्ञान घेऊन आला.

सरंजामी पायाचर आधारलेल्या भारतीय समाजरच नेत अत्यंत क्रांतीकारक बदल फक्त समाजवादच घडवूण आणू शकेल असा विश्वास त्यांच्या मनात निर्माण झाला होता. सामाजिक समस्यांकडे भ्रमविरहीत शास्त्रीय दृष्टीने पाहण्यास समाजवादानेच नेहरूंना शिकवले होते. केवळ परिणामांशी झुंजणे व्यर्थ आहे, त्या परिनामांची कारणे शोधून त्यांचे निर्मूलन आधी केले तरच परिणामांचेही आपोआपच उच्चाटन होऊ शकेल, हा दृष्टीकोन नेहरूंनी सगळया सामाजिक अनिष्टांबद्दल घेतला. त्यांच्या सामाजिक फेररचनेच्या कार्यक्रमातील पहिली गोष्ट विषमतेचा मुकाबला करणे ही होती. उत्पादनसाधनांच्या विकासा बरोबरच मालमत्ता वितरणाच्या पद्धतीतही कसाकसा फरक पडत गेला हे मानवी विकासाच्या आधारे जवाहरलाल नेहरूंनी अभ्यासले.

उद्योग प्रधान अर्थव्यस्थेत संपत्तीची वाढ होऊनही गरीब गरीबच राहतात, कार्यकारणाचा त्यांनी वेध घेतला. श्रमाचे अर्थार्जनाशी प्रमाण व्यस्तच राहील्यामुळे श्रमाची प्रतिष्ठाच कालांतराणे नाहीशी होते. खाजगी मालमत्तेमुळे आर्थिक विषमतेची तिव्रता वाढते. नेहरूंच्या मते खाजगी मालमत्तेच्या 'पवित्र्या' ला नवे उद्योग प्रधान अर्थव्यवस्थेत मुळीच स्थान असु नये. आर्थिक विषमता मालमत्तेचे सदोष वितरण यांची वाढ करून भांडवलदारी ने 'कायद्यासमोरील समतेला' व समान मताधिकाराला निष्पळ–निरर्थक करून सोडले. त्या दृष्टीने सामाजिक समता हे आदयसाध्य असायला हवे व त्यासाठी उत्पादनसाधनांवर सामाजिक नियंत्रण आणि खाजगी मालमत्तेवर कडक निर्बंध असणे सर्वांना विकासाची समान संधी असणे त्यांच्या मते आवश्यक होते. भांडवलदारी अर्थव्यवस्थेतील



Scanned by CamScanner

शासन विशिष्ट वर्गाचेच राहते. जनतेचे, जनतेने, जनतेसाठीच चालविलेले शासन फक्त समाजवादाव्दारेच शक्य होते. कारण त्या अर्थव्यवस्थेतच जनसामान्यांना शासनात व राष्ट्रीय मालमत्तेचे खऱ्या अर्थाने वाटेकरी होता येते.

पं. नेहरू दारिद्रयाला मानवाचा सर्वात मोठा शत्रू मानतात. दारिद्रय हे अति तिरस्करणीय असुन ते नष्ट झालेच पाहीजे. जेव्हा दारिद्रयाचा उगम वर्गिय शोषणातून होतो तेव्हा तर तो सामाजिक अन्यायाचा प्रचंड मूलस्त्रोत ठरतो. दारिद्रय निर्मूलन हे समाजवादाचे महत्वाचे साध्य आहे. विषमतानिर्मूलनापेक्षाही या साध्याला नेहरू महत्व देतात. दारिद्रयविरहित विषमता त्यांना द्रारिद्रययुक्त समतेपेक्षा अधिक इष्ट वाटते. संपत्तीचे न्याय वितरण म्हणजे धनिकांचा पैसा हिरवून गरिबांना वाटून देणे नव्हे, कारण त्यातून फारसे काहीच साधणार नाही, तर संपत्तीचे उत्पादन वाढवून तिचे न्याय वितरण करणे पं. नेहरूंना अधिक अभिप्रेत होते. दारिद्रयनिर्मूलनाबाबत पं. नेहरू कोणाशीच व कशाशीच तडजोड करावयास तयार नव्हते. म. गांधींनी केलेल्या 'दारिद्रयाचा उदात्तीकरणा'शी ते सहमत नव्हते. दारिद्रय निर्माण व सहन करणाऱ्या समाजव्यवस्थेवर ते कडकडून टिका करीत. वर्गकलह व वर्गशोषण या अरिष्टांना पोसणाऱ्या जमिनदारी –तालुकदारीला ते प्रगतीच्या व उत्पादनवाढीच्या वाटेतील अडसर माणित. त्यांच्या बंदोबस्तासाठी मं. गांधींनी सुचवलेल्या विश्वस्तवृत्तीचा मार्ग पंडितजींना पटत नव्हता. माणसांपैकी सर्वोत्तम असलेलेसुध्दा, तेवढे परिपूर्ण असतील असे नेहरूंना वाटत नव्हते. त्यानबरोबर हिंसा, सक्तीचा व बळाचा वापर आणि क्रांती हेही मार्ग नेहरूंनी ताज्य ठरवले. लोकशाहीच्या शांतापूर्ण मार्गानी समाजवाद असणे शक्य होईल अशी त्यांना खात्री होती.

कामगार–शेतकऱ्यांच्या ठिकाणी हिंसक मनोवृत्ती वाढविण्यातूनच समाजवाद येऊ शकेल हे त्यांना पटत नव्हते. प्रासंगिक हिंसाचरातून व उद्रेकातून चळवळीचे बळ वाढत नाही. शिस्तबध्द संघटनेतून व शांततापूर्ण कृती करण्यातून ते वाढते, असे त्यांचे मत होते. समाजवादातून काही वर्गाचे हितसंबंध दुखावणार असल्यामुळे संघर्ष अटळ ठरेल याची नेहरूंना जाणीव होती. राज्याने लोकमताच्या आधरे बळाचा वापर करून भांडवलशाहीत गुंतलेले हितसंबंध वगळण्याचा प्रयत्न करावा कोणी आपल्या सवलती सहजासहजी सोडण्यास स्वेच्छेने तयार होत नाही. नेहमीच कोणत्या तरी स्वरूपात बळाचा व दबावाचा वापर करावाच लागतो. खाजगी संपत्तीची आधुनिक जगात बदलेली व बदलत जाणारी संकल्पना समोर ठेवून त्यानुसार राज्यसंस्थेला वागणे भागच असते. लोकमताच्या मागणीनुसार मायद्यान्वये अधिकाधिक हस्तक्षेप करून अमर्याद खाजगी मालमत्तेवर निर्बंध आणणे राज्यासाठी अटक होऊन बसते. खेर पाहता बदलत्या परिस्थितीत चाहूल प्रत्येक वर्गानेच घ्यावी व त्यानुसार जुळवून घ्यावे. भांडवलदारीने एकेकाळचे प्रश्न सोडवले असले तरी. आजचे सोडवण्यास ती असमर्थ आहे. तिने उत्पादनात वाढ केली असली तरी वितरणाबाबत ती कधीच समाधानकारकपणे करू शकली नाही. समान आर्थिक न्याय व संधी, मानवाचे नैतिक–भौतिक उत्पादन, आध्यात्मिक मुल्ये, सहकार्य, नि:स्वार्थीपणा, सेवाभाव इत्यादींची जोपासना यावर आधारलेली वर्गमुक्त समाजव्यवस्था सक्ती आणि मतपरिवर्तन यांच्या तडजोडीमधूनच उभी राहू शकते असे पं. नेहरू म्हणतात. एकदा वरील व्यवस्था ध्येय म्हणून स्वीकारल्या नंतर त्या ध्येयाच्या मार्गात जे जे येईल ते ते शक्यतो सामोपचाराने आणि जरूर तर तीक्ष्णोपचाराने दूर केले पाहिजे. परंतु सक्ती करावी लागली तरी ती व्देषभावनेने अथवा क्रुरपणे न करता अडशळा दूर करण्याच्याच हेतून केली जावी, असे त्यांचे मत होते. मनुष्यस्वभावच असा आहे की विज्ञप्ती वा मनधरणी हे मार्ग जनसमूहापुढे यशस्वी ठरतीलच असे नाही. मनपरिवर्तनाबरोबरच सक्तीही करावी लागेल. पण सक्तीचे क्षेत्र मर्यादित राहावे व सक्ती करताना अनिष्ट गोष्टी कमीत कमी प्रमाणात होतील अशी व दक्षता घ्यावी, असे ते म्हणतात. मजूरांना आपण केवळ उत्पादन प्रक्रियेचे निर्जीव घटक नसून श्रमसाफल्याचे भागीदार आहोत अशी जाणीव झाली पाहीजे. ट्रेड युनियन्स असणे त्यांना आत्यावश्यक वाटते, मजुरांचा संप–हक्काही तो मान्य करतात. आजपर्यंत त्या वर्गावर झालेल्या अन्यायाचे परिमार्जन होणे त्यांना अगत्याचे वाटते. मोठमोठया कारखान्यांना उत्तेजन देणे त्यांचे राष्ट्रीयीकरण करणे ते आवश्यक मानतात. कारण औद्योगिकदृष्टया मागासलेल्या राष्ट्राचे राजकिय स्वातंत्र्य त्यांना निरर्थक वाटते.



Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013)
Special Issue
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
March 2019

पं. नेहरूंच्या मते, समाजवादाचे केवळ भावनिक आकर्षण असून चालणार नाही. तर प्रत्यक्ष परिस्थितीचे अध्ययन करून तिच्या आधारे या देशासाठी इष्ट ठरू शकणाऱ्या समाजवादाची उभारणी करावी लागणार आहे. त्यांची समाजवादी समाजरचना साचेबंद किंवा ठोकळेबाज धर्तीची नव्हती. प्रयोगक्षमतेस तीत भरपूर वाव होता. ध्येयसिध्दी हाच एक निकष होता. परिवर्तनशील जगावर पुस्तकी व ताठर तत्वे लादण्याचा दुराग्रह पं. नेहरूंच्या विचारात नव्हता.

पं. नेहरूंचा समाजवाद व्यक्तिस्वातंत्र्यास मारक नव्हता. लोकशाही आणि समाजवाद या दोघांचेही हेतू विषमता नाहिशी करणे व सामाजिक न्याय सुलभ करणे हा असल्यामुळे त्या दोहोत. आवश्यकत: अंतर्विरोध संभवतच नाही. स्वातंत्र्य व लोकशाही समतेविना अशक्य असून समता प्रस्थापित होण्यासाठी उत्पादनाची मुख्य साधने खाजगी मालकीतून बाहेर पडणे अनिवार्य असल्यामुळे, समाजवाद लोकशाहीला पुरकच ठरतो. समाजवादातर्गत व्यक्तीला स्वातंत्र्य तर मिळतेच, त्याचबरोबर आर्थिक सुरक्षितताही प्राप्त होते. व्यक्तीचे वेगळेपण व अस्मिता समाजवाद चिरडून टाकीत नाही. लोकशाही सर्वाधिकाराखाली खाजगी मालकी संपूर्णपणे मोडून पडत नाही. फक्त महत्वाचे उद्योगधंदे सार्वजनिक मालकीचे होतात. आणि लहान ग्रामद्योग सहकारी स्वामित्वाखाली येतात. समतेच्या दिशेने मालमत्तेचे न्याय वितरण शक्य होते. त्यासाठी संतुलित नियोजनाची मात्र गरज असते.

अशाप्रकारे या देशाचे पहिले पंतप्रधान म्हणून व त्या नात्याने या देशातील लोकशाहीचे संयोजक म्हणून नेहरूंचे स्थान या देशाच्या इतिहासात अजरामर आहे. त्याचप्रमाणे आधुनिक भारतातील राजकिय विचारवंतही त्यांचे स्थान मानाचे आहे. त्यांनी राष्ट्रवादाची धर्मनिरपेक्ष व्याख्या केली, राष्ट्रवादाचा आंतरराष्ट्रवादाशी मेळ घातला. शांततामय सहजीवनाचे सूत्ररूप तत्वज्ञान पंचशीलेच्या स्वरूपात दिले, प्रतिगामी व सांप्रदायिक शक्तींवर कठोर प्रहार केले. गांधीवादाला व्यवहार्य स्वरूप दिले, लोकशाही व समाजवाद या दोघांना अन्योन्याश्रमी कसे करता येईल ते दाखवले. लोकशाहीचे ते निस्सीम उपासक होते. व्यक्ती हा त्यांच्या सर्वांगीण चिंतनाचा विषय होता.

समाजवादातील नैतिक आवाहन फारतर भारतीय परंपरेतील भूतदयावादी विचारांशी जरा मिळते–जुळते आहे.

संदर्भग्रंथ .–


- नेहरू : आत्मचरित्र : मराठी अनुवादक – ना.ग.गोरे.
- जवाहरलाल नेहरू स्पिचेस : खंड तिसरा.
- सिलेक्टेड राईटिंग्ज ऑफ जवाहरलाल नेहरू.
- नेहरू : डिस्कव्हरी ऑफ इंडिया, (१९६७).
- दि पोलिटीकल फिलॉसफी ऑफ जवाहरलाल नेहरू : एम.एन. दास.
- पंडीत जवाहरलाल नेहरू समाजवादी चळवळ : खुराणा, पन्नालाल.


Scanned by CamScanner